**औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद.**

**दिनांक 19.06.2010 रोजी (का.प.क्रं.02) संपन्न झालेल्या स्थायी समिती विशेष सभेचे इतिवृत्त.**

शनिवार दिनांक 19 जुन 2010 रोजी मा.सभापती श्री.राजू रामराव शिंदे यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे दुपारी 11.00 वाजता वंदेमातरम् या गिताने सुरू झाली सभेला मा.आयुक्त,डॉ.पुरूषोत्तम भापकर,भा.प्र.से., नगरसचिव श्री.एम.ए.पठाण यांचेसह संबधीत अधिकारी तसेच खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

01. स. श्री. सुर्यकांत सुभानराव जायभाये
02. स. श्री. विजय लक्ष्मणराव वाघचौरे
03. स. श्री. जगदीश कन्हैय्यालाल सिध्द
04. स. श्री. खान आगा मीयॉ
05. स. श्री. विकास रतनलाल जैन
06. स. श्री. रेणुकादास (राजू) दत्तोपंत वैद्य
07. स. श्री. महेश शिवाजीराव माळवतकर
08. स. सौ. साधना गणेश सुरडकर
09. स. श्री.अमित सुधाकर भुईगळ
10. स. श्री.नासेरखॉन अब्दुल रहेमानखान
11. स. श्री.अब्दुल साजेद अ.सत्तार
12. स. श्री. मधुकर दामोधर सांवत
13. स. श्री.जुबेर गाझी असीर अहमद
14. स. श्री.प्रल्हाद गणपतराव निमंगावकर

**संवाद :**

श्री.मधुकर सावंत :सभापती म्हणून आपली हि पहिलीच सभा आहे त्यामुळे आपले अभिनंदन करण्यात येते वर्षभर आमच्याकडुन सहकार्य करण्याची हमी देण्यात येते तसेच वर्षभर या सभागृहात चांगले निर्णय व्हावे व शहराचा चांगला विकास व्हावा विकासाचे कामे स्थायी समितीच्या माध्यमातून व्हावे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :स.सदस्यांनी जी भावना व्यक्त केली आहे त्यास माझे अनुमोदन आहे.

**विषय क्र. 02 :**

दिनांक 23/02/2010 (का.प.क्र.27),26/02/2010 (का.प.क्र.28),27/04/2010 (का.प.क्र.29) आणि दि.02/06/2010 (का.प.क्र.01) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभांचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

मा.सभापती :विषय क्रमांक 2 दिनांक 23.02.2010, 26.02.2010, 27.04.2010, 02.06.2010 रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभांचे इतिवृत्त कायम करणेचा विषय मंजूर करण्यात येतो.

श्री.मधुकर सावंत :दिनांक 23.02.2010 रोजी रोजी संपन्न झालेल्या स्थायी सभेच्या इतिवृत्तात उपआयुक्त (सिडको) यांनी संतोषीमाता मंदिर येथील दोन टपऱ्यांची प्रशासकीय अधिकारी यांनी पहाणी केलेली आहे. दोन दिवसांत टपऱ्या काढण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. टपरीधारकाच्या घरी दु:खद घटना घटली असल्याने दोन दिवसांची मुदत मागीतली होती. टपऱ्या काढण्यात आल्या किंवा नाही प्रशासनाने खुलासा करावा.

उपआयुक्त(सिडको) :सध्या माहीती उपलब्ध नाही. थोडया वेळात माहिती घेऊन खुलासा करण्यात येईल.

श्री.मधुकर सावंत :प्रशासनाने दोन दिवसांचा वेळ दिला होता त्यानंतर प्रशासनातर्फे कुठली कार्यवाही केली सांगण्यात यावे.

मा.सभापती :स.सदस्यांचे समाधान झाले पाहिजे असे उत्तर देण्यात यावे.

उपआयुक्त(सिडको) :15 मि.वेळ देण्यात यावा खुलासा करण्यात येईल.

मा.सभापती :विषय क्रमांक 2 मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

दिनांक 23/02/2010 (का.प.क्र.27),26/02/2010 (का.प.क्र.28),27/04/2010 (का.प.क्र.29) आणि दि.02/06/2010 (का.प.क्र.01) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभांचे इतिवृत्त कायम करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत आली.

मा.सभापती : विषय क्रमांक 3 नगर सचिव यांनी वाचून दाखविण्यात यावे.
(नगर सचिव यांनी विषय क्रमांक 3 वाचून दाखविला.)

**विषय क्र. 03 :**

कार्यकारी अभियंता (वार्ड इ व फ) महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, रस्त्यावर/उघड्यावर होणारी मांस विक्री बंद करण्याचे मा.उच्च न्यायालयाचे आदेश असल्यामूळे, महानगरपालिकेच्या मालकीची ज्या ज्या ठिकाणी मोडकळीस आलेली दुकाने आहेत ती पाडून त्या ठिकाणी नवीन दुकाने बांधणे आणि ज्या ठिकाणी नुतणीकरण करणे आवश्यक आहे, त्या दुकानांचे नुतणीकरण करून सर्व सोयी सुविधायुक्त अद्यावत दुकाने उपलब्ध करणेचा निर्णय घेण्यात आला आहे.

शहरातील विविध ठिकाणची बीफ आणि मटनची मोडकळीस आलेल्या दुकानांच्या इमारती पाडून त्या ठिकाणी मांस विक्रीसाठी नवीन दुकाने बांधणेच्या प्रस्तावापैकी नवाबपुरा येथील मोडकळीस आलेले जूने मटन मार्केट (तळमजला मटन मार्केट पहिला मजला लायब्ररी हॉल) पाडून त्या ठिकाणी नवीन दुकाने व हॉल बांधणेचा हा एक प्रस्ताव आहे. जूनी इमारत आहे त्या स्थितीतील पाडून व्यर्थ व उपयोगी साहित्याची विल्हेवाट लाऊन जागेचे सपाटीकरण करणेस स्वतंत्र जाहीर निविदा मागविणेस आणि उपलब्ध होणाऱ्या जागेवर मटन विक्रीची नवीन दुकाने बांधणेच्या कामाचे सन 2008-2009 च्या दरसूची नुसार तयार केलेले अंदाजपत्रक रक्कम रू.15,43,921/- मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.प्रल्हाद निमगांवकर :महानगरपालिकेच्या जागेवर बांधणे ठिक आहे. परंतु महानगरपालिकेच्या उघडया जागेवर विक्री होते त्याचे काय? शहरात मटन विक्रीचा व्यवसाय अवैधरित्या सुरू आहे. महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचाऱ्यांचे त्याकडे दुर्लक्ष आहे. तक्रार दिल्यास स.नगरसेवकांनी तक्रार दिली आहे म्हणून आमचे नांव सांगतात. रस्त्यावर विकणाऱ्या मटन,मच्छीवाल्यांची पर्यायी व्यवस्था करण्यात यावी.

श्री.मधुकर सावंत :मा.उच्च न्यायालयाने निर्देश दिल्यानंतर प्रशासन कार्यवाही करते. विषय क्रमांक 3,4 व 5 हे बीफ व मटन मार्केटचे विषय आहे. शहरात किमान 200 ठिकाणी उघडया जागेवर मटनाचा व्यवसाय केला जातो त्या ठिकाणी प्रशासनाचा कुठल्याही अधिकाऱ्याचे लक्ष नाही , काही होत नाही सर्सास हप्ते दिले जाते. स.माजी सदस्य श्री.सुरे यांनी हा प्रकार उघडकीस आणला होता त्यानंतर त्यांना 15 दिवस हर्सुल जेलमध्ये जावे लागले त्यांच्यावर खोटे आरोप लावण्यात आलें. मा.उच्च न्यायालयाचा आदेश आल्यानंतरच कार्यवाही केली पाहिजे काय? हे बरोबर नाही. उघडयावर होणारे मास विक्री ताबडतोब थांबली पाहिजे.

श्री.प्रल्हाद निमगांवकर :प्रत्येक वेळेस विषय मांडल्यानंतर काहीच कार्यवाही होत नाही.

मा.सभापती :विषय क्रमांक 3 मा.उच्च न्यायालयाचे आदेश असल्याकारणाने मंजूर करण्यात यावा. उघडयावरती व अनाधिकृतपणे मांस विक्री होते ती ताबडतोब बंद करण्यात यावे नसता त्यांचेकडे आपले परवाना असतील तर न्यायालयाने जे आदेश दुकांनासाठी घालून दिलेले आहे तेच नियम त्यांना लागू करण्यात यावे आणि त्या नियमांचे काटेकोरपणे पालन होते किंवा नाही हे कटाक्षाने अधिकाऱ्यांने बघतीले पाहिजे. मा.उच्च न्यायालयाचा अवमान होत असेल तर अशा दुकांनावरती कार्यवाही करावी नसता संबधीत अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्यात येईल. शहरातील सर्व मांस विक्रीचे दुकाना असतील त्या सर्व दुकानांचा सर्वे करून माहिती देण्यात यावी. तसेच किती दुकानांना परवाने दिलेले आहे . ज्या दुकाना अनाधिकृत आहे त्या बंद करण्यात यावे तसेच ज्या दुकानांना परवाने दिलेले आहे ते मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रामाणे आहे किंवा नाही याची तपासणी करण्यात यावी त्यांना रेग्युलाईज करण्यात यावे नसता त्यांचे परवाने रद्द करण्यात यावे.

श्री.नासेरखॉन अ.रहेमान खान : स.सदस्यांनी जी चर्चा केली आहे प्रशासनाने खुलासा करावा की, बीफ, मास,मच्छी,मटन यांचे एकत्रित मार्केट तयार करण्यात येवु शकते काय? बीफ चे परवाने किती देण्यात आले आहे. जे मार्केट तयार करण्यात येणार आहे ते पुरेल का? 400 बीफचे परवाने आहे 150 ते 200 मटनाचे आहे 450 चिकन मार्केट आहे. हे सर्व मिळून 800 आहेत. हे सर्व 4 या ठिकाणी adjust होईल काय? प्रशासनाने खुलासा करावा की, शहरात किती दुकानांना परवाने दिलेले आहे.

श्री.मधुकर सावंत :नॉर्मस् ठरवुन दिलेले असतांना दुकाने उघडयावरती का आहे. प्रशानाने खुलासा करावा की, किती दुकानांना परवाने दिलेले आहे व किती दुकानांना परवाने दिलेले नाही. नियम व अटी काय आहे.

मा.सभापती :माहीतीसाठी 8 दिवसांची मुदत देण्यात येते.

श्री.रेणुकादास वैद्य :8 दिवसाची मुदत कशाला. त्यांचेकडे माहीती असेल.

मा.सभापती :ज्यांचेकडे परवानगी नाही त्यास वेळ लागेल.

संचालक (प्रा.सं.) :औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये कार्यालया मार्फत खालील प्रमाणे परवाने देण्यात आलेले आहे.

| | **वॉर्ड अ** | **वॉर्ड ब** | **वॉर्ड क** | **वॉर्ड ड** | **वॉर्ड इ** | **वॉर्ड फ** |
|---|---|---|---|---|---|---|
| **बीफ** | 59 | 15 | 118 | 36 | 08 | 36 |
| **मटन** | 18 | 16 | 20 | 23 | 23 | 21 |
| **चिकन** | 07 | 10 | 14 | 12 | 07 | 07 |
| **मासे विक्री** | 02 | 01 | 02 | 02 | 02 | 05 |
| **एकुण परवाने** | **86** | **42** | **154** | **73** | **40** | **69** |

श्री.रेणुकादास वैद्य :मांस,चिकन,बिफ वेगवेगळी आहेत. एकत्र का ठेवले.

मा.सभापती :एकुण शहरात किती परवाने दिलेले आहे.

संचालक(प्रा.सं.) :464 परवाने दिलेले आहे.

मा.सभापती :नार्मस् प्रमाणे किती बसतात चौकशी केली का.

संचालक(प्रा.सं.) :दुकान बंदिस्त असले पाहिजे,जाळी असली पाहिजे, काच असली पाहिजे.

श्री.प्रल्हाद निमगांवकर :शहरात या नियम व अटी अंमलात आणलेली एक तरी दुकान दाखविण्यात यावे

मा.सभापती :नियम व अटींमध्ये किती दुकाना बसतात. परवाना देण्यापुर्वी आपण स्वत: त्या ठिकाणी भेट देवुन या सर्व बाबींची तपासणी करता काय?

संचालक(प्रा.सं.) :Inspector आणि L.S.S यांच्या अहवाल आल्यानंतर परवाना दिला जातो.

श्री.रेणुकादास वैद्य :शहरात महानगरपालिकेने जी नियमावली ठरवून दिलेले आहे त्याप्रमाणे एखादे तरी दुकान प्रशासनाने दाखविण्यात यावे.

मा.सभापती :नियम व अटी पुर्ण केलेल्या दुकाना आहेत का?

श्री.मधुकर सावंत :माझा स्पष्ट आरोप आहे की, संबधीत अधिकारी यांनी पैसे घेऊन परवाना दिलेला आहे. भष्ट्राचार केलेला असल्यामुळे एकही दुकान दाखवु शकत नाही. कार्यालयात बसून परवाने दिलेले आहे. शहरात चार दुकाना दाखविण्यात याव्या ज्या अटी पुर्ण करतात.

संचालक(प्रा.सं.) :दाखविता येईल.

मा.सभापती :सभा संपल्यानंतर चार वाजता स.सदस्य श्री.मधुकर सावंत आणि श्री.रेणुकादास वैद्य यांना सोबत घेऊन दुकाना दाखविण्यात याव्या. जी अनाधिकृत दुकाने आहेत त्या सर्व दुकानांना हया नियम व अटींची पुर्तता संबधीत अधिकारी/कर्मचारी यांनी करून घेतली पाहिजे नसता सर्वांवर निलंबनाची कार्यवाही केली जाईल.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :ज्या लोकांनी लायसन्स रिन्युवल करण्यासाठी त्यांचेकडे अर्ज दिलेला आहे त्यापैकी 100 टक्के लायसन्स त्यांनी रिन्युव केले आहे काय? बाकी असेल तर का बाकी आहे किती दिवसांपासून बाकी आहे खुलासा देण्यात यावा.

संचालक(प्रा.सं.) :रूटीन चालू आहे. माझेकडे एकही संचिका प्रलंबित नाही. ज्या संचिका आलेल्या आहेत त्या तपासणीसाठी पाठविण्यात आलेल्या आहेत. तपासणीमध्ये ज्यांचे रिपोर्ट रिन्युव करण्यास हरकत नाही असे आलेले आहे. त्यांना रिन्युव केलेले आहे. बाकीच्यांना रिजेक्ट केलेले आहे.

श्री.जगदिश सिध्द :ठराव पास करण्यासाठी मतदान घेण्यात यावे.

संचालक(प्रा.सं.) :नियमानुसार नाही म्हणुन रिजेक्ट केले.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :शहरात ज्या मांस विक्रीच्या दुकाना चालु आहे त्या सर्व नियमानुसार चालु आहे काय? खुलासा करण्यात यावा.

संचालक(प्रा.सं.) :जे नियमानुसार नाही त्यांचे विरूध्द कारवाई करण्यात येत आहे.

श्री.विकास जैन :हे सर्व ठराव पास करण्या अगोदर मा.सभापती यांना विनंती आहे की, यावर मतदान घेण्यात यावे.

मा.सभापती :हे सर्व ठराव पास करणे गरजेचे आहे कारण मा.उच्च न्यायालयाचे आदेश आहे. आपल्यासमोर Proceeding झालेली आहे. हा ठराव मंजूर करून शहरात जेवढया अवैधरित्या दुकाना आहेत ती दुकाने बंद करण्यात यावी ज्यांना परवाने दिलेले आहेत ते नियमात बसतात किंवा नाही याची तपासणी करण्यात यावी. दुकाने बंद करण्यात याव्यात नसता अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्यात येईल. ठराव मंजूर करण्यात येत आहे.

श्री.विकास जैन :सर्व सदस्यांना बोलण्याचा अधिकार आहे. मा.सभापती यांनी आपला निर्णय द्यावा परंतू सर्व सदस्यांचे मत जाणून घेतले पाहिजे. सदस्यांचा आक्षेप जाणून घेतला पाहिजे. सर्व प्रस्तावावर मतदान आवश्यक आहे मतदान आवश्यक घेण्यात यावे हि विनंती आहे.

श्री.जगदिश सिध्द :सर्व ठरावांवर मतदान आवश्यक आहे.

मा.सभापती :सदरील ठराव रद्द केल्यास मा.उच्च न्यायालयाचा अवमान होण्याची शक्यता आहे.

श्री.विकास जैन :ठराव रद्द करण्याच्या बाबतीत बोलत नाही. सगळया प्रस्तांवावर आज मतदान घ्यायला पाहिजे. प्रत्येक विषयावर मतदान झाले पाहिजे असा प्रस्ताव आहे सर्व सदस्यांची मागणी आहे. मा.सचिव यांनी याबाबतीत खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती :सचिवांनी खुलासा करावा.

नगर सचिव :मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनुसूचि ड प्रकरण 2 अनुसूचि ड नियम 3 (फ) प्रमाणे या अधिनियमात अन्यथा तरतूद करण्यात आलेली असेल त्याव्यतिरिक्त प्रत्येक प्रश्नावर, सभेत उपस्थित असलेल्या व त्या प्रश्नावर मतदान करणाऱ्या स्थायी समितीच्या सदस्यांच्या बहुमताने निर्णय घेण्यात आला पाहिजे, आणि समसमान मते पडतील तेंव्हा, अध्यक्षस्थानी असलेल्या प्राधिकाऱ्यास दुसरे किंवा निर्णायक मत असेल. जादा नियमातील नियम क्रमांक 66(10) प्रमाणे मतदान हात वर करून घेण्यात येईल. मताला टाकण्यात आलेल्या प्रत्येक प्रश्नावर अनुकूल आणि प्रतिकूल अशी मते घेण्यात येतील.

श्री.विकास जैन :नियमावली मा.सचिव यांनी वाचवून दाखविलेली आहे. त्याचप्रमाणे या सभागृहात नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी. नियमाच्या बाहेर बोलत नाही.

श्री.मधुकर सावंत :स.सदस्यांची जी मागणी आहे परंतु सभागृहात प्रस्ताव जर टाकला तर त्याच्यावर विरोध नोंद करून तो ठराव मंजूर केला जातो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नवाबपुरा येथील मोडकळीस आलेले जूने मटन मार्केट (तळमजला मटन मार्केट पहिला मजला लायब्ररी हॉल) पाडून त्या ठिकाणी नवीन दुकाने व हॉल बांधणेचा हा एक प्रस्ताव आहे. जूनी इमारत आहे त्या स्थितीतील पाडून व्यर्थ व उपयोगी साहित्याची विल्हेवाट लाऊन जागेचे सपाटीकरण करणेस स्वतंत्र जाहीर निविदा मागविणेस आणि उपलब्ध होणाऱ्या जागेवर मटन विक्रीची नवीन दुकाने बांधणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेले र.रू.15,43,921/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 04 :**

कार्यकारी अभियंता (वार्ड इ व फ) महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, रस्त्यावर/उघड्यावर होणारी मांस विक्री बंद करण्याचे मा.उच्च न्यायालयाचे आदेश असल्यामूळे, महानगरपालिकेच्या मालकीची ज्या ज्या ठिकाणी मोडकळीस आलेली दुकाने आहेत ती पाडून त्या ठिकाणी नवीन दुकाने बांधणे आणि ज्या ठिकाणी नुतणीकरण करणे आवश्यक आहे, त्या दुकानांचे नुतणीकरण करून सर्व सोयी सुविधायुक्त अद्यावत दुकाने / मार्केट उपलब्ध करणे बाबत महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने निर्णय घेण्यात आला आहे. शहरातील विविध ठिकाणची बीफ आणि मटनची मोडकळीस आलेल्या दुकानांच्या इमारती पाडून त्या ठिकाणी नवीन इमारती बांधणेच्या प्रस्तावापैकी बारूदगर नाला मटन व चिकन मार्केट येथील मोडकळीस आलेले जूने मार्केट पाडून त्या ठिकाणी नवीन दुकाने बांधणेचा हा एक प्रस्ताव आहे. जूनी मोडकळीस आलेली इमारत आहे त्या स्थितीतील पाडून मलबा व साहित्य घेवून जाणेसाठी स्वतंत्र निविदा मागविण्यात येतील. आणि त्यानंतर उपलब्ध होणाऱ्या जागेवर नविन मटन व चिकन मार्केट बांधण्यात येईल. करीता सन 2008-2009 च्या दरसूची नुसार नविन मटन व चिकन मार्केटसाठी दूकाने बांधणेच्या कामासाठी अंदाजपत्रक रक्कम रू.19,82,752/- चे तयार केले असून अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यतेस्तव सादर.

मा.सभापती :विषय क्रमांक 4 मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, बारूदगर नाला मटन व चिकन मार्केट येथील मोडकळीस आलेले जूने मार्केट पाडून त्या ठिकाणी नवीन दुकाने बांधणे व जूनी मोडकळीस आलेली इमारत आहे त्या स्थितीतील पाडून मलबा व साहित्य घेवून जाणेसाठी स्वतंत्र निविदा मागविण्यास आणि त्यानंतर उपलब्ध होणाऱ्या जागेवर नविन मटन व चिकन मार्केट बांधण्याच्या कामाचे तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.19,82,752/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 05 :**

कार्यकारी अभियंता (वार्ड इ व फ) महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, रस्त्यावर/उघड्यावर होणारी मांस विक्री बंद करण्याचे मा.उच्च न्यायालयाचे आदेश असल्यामूळे, महानगरपालिकेच्या मालकीची ज्या ज्या ठिकाणी मोडकळीस आलेली दुकाने आहेत ती पाडून त्या ठिकाणी नवीन दुकाने बांधणे आणि ज्या ठिकाणी नुतणीकरण करणे आवश्यक आहे, त्या दुकानांचे नुतणीकरण करून सर्व सोयी सुविधायुक्त अद्यावत दुकाने उपलब्ध करणेचा निर्णय घेण्यात आला आहे.

शहरातील विविध ठिकाणची बीफ आणि मटनची मोडकळीस आलेल्या दुकानांच्या इमारती पाडून त्या ठिकाणी मांस विक्रीसाठी नवीन दुकाने बांधणेच्या प्रस्तावापैकी बुक्कलगुडा शहागंज येथील मोडकळीस आलेले जूने मटन मार्केट पाडून त्या ठिकाणी नवीन दुकाने बांधणेचा हा एक प्रस्ताव आहे. जूनी इमारत आहे त्या स्थितीतील पाडून व्यर्थ व उपयोगी साहित्याची विल्हेवाट लाऊन जागेचे सपाटीकरण करणेस स्वतंत्र जाहीर निविदा मागविणेस आणि उपलब्ध होणाऱ्या जागेवर मटन विक्रीची नवीन दुकाने बांधणेच्या कामाचे सन 2008-2009 च्या दरसूची नुसार तयार केलेले अंदाजपत्रक रक्कम रू.10,45,093/- मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

| | |
|---|---|
| श्री.जगदिश सिध्द | :प्रस्तावाबाबत,न्यायालयाच्या निर्णया बाबत अधिकारी यांनी खुलासा करावा. |
| श्री.विकास जैन | :मा.उच्च न्यायालयचे कोणते आदेश आहे खुलासा करण्यात यावा. संबधीत अधिकारी यांनी खुलासा करावा. |
| संचालक(प्रा.सं.) | :मा.उच्च न्यायालयाच्या समोर मा.जस्टीस श्री.एस.एस.शिंदे आणि मा.न्यायमुर्ती श्री.एस.एस.खानविलकर यांचे कोर्टा समोर 9 मार्च रोजी जनहित याचीका सुनावणीस आले होते. त्यामध्ये अवैध कत्तल बंद करण्यासाठी Affidavit दाखल करण्यास सांगीतले होते त्याच्यामध्ये उघडयावरती मांस विक्रेत्यांनी Counter Affidavit दाखल केले होते की सुविधा उपलब्ध करून द्या. मांस विक्री करू द्या. मा.न्यायालयाने असे आदेश दिले होते की, शहराची लोकसंख्या आणि गरज लक्षात घेऊन मॉर्डन मार्केट सुविधा उपलब्ध करून द्या. मा.न्यायालयाने 15 दिवसांची मुदत दिली होती परंतु महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणुक-2010 व त्यानंतर मा.महापौर व स्थायी समितीची निवडणुक असल्याकारणाने व सर्वसाधारण सभा व स्थायी समितीमध्ये याबाबती निर्णय या सर्वांसाठी साधारणतः तीन महिण्यांचा कालावधी लागणार असे निश्चित करून दिनांक 28.06.2010 पर्यंतची मा.न्यायालयास मुदत मागण्यात आली. त्यानुसार दिनांक 28 जूनला न्यायालयात Affidavit दाखल करायचे आहे. त्या संदर्भात हे ठराव ठेवण्यात आलेले आहे. |
| मा.सभापती | :विषय क्रमांक 5 मंजूर करण्यात येतो. |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, बुक्कलगुडा शहागंज येथील मोडकळीस आलेले जूने मटन मार्केट पाडून त्या ठिकाणी नवीन दुकाने बांधणे व जूनी इमारत आहे त्या स्थितीतील पाडून व्यर्थ व उपयोगी साहित्याची विल्हेवाट लाऊन जागेचे सपाटीकरण करणेस स्वतंत्र जाहीर निविदा मागविणेस आणि उपलब्ध होणाऱ्या जागेवर मटन विक्रीची नवीन दुकाने बांधणेच्या कामाचे तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.10,45,093/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 06 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वॉर्ड क्र.51 (दक्षिण) अंतर्गत गल्ली नं.22,23 व 24 इंदिरानगर येथे 100 व 150 मीमी व्यासाची डी.आय.के.7 जलवाहीनी टाकणे या कामाकरिता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाच्या सन 2008-09 नुसार रक्कम रू.12,50,641/- एवढ्याचे अंदाजपत्रक करण्यात

आले होते. त्यास मा.स्थायी समिती विषय क्र.390 दि.15/2/2010 अन्वये मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार ई-टेंडरींग मार्फत निविदा मागविली असता, त्याचा तपशील खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| 01. | मे.उदय इंजिनिअरींग वर्क्स | 13.00 % कमी दराने |
| 02. | श्री.सुरेश बी.साधवानी | 12.70 % कमी दराने |
| 03. | मे.एल.के.कन्स्ट्रक्शन | 9.86 % कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 13.00 % कमी दराची निविदा मे.उदय इंजिनिअरींग वर्क्स आहे. त्यास मा.आयुक्त महोदय यांची मान्यता झालेली आहे.

तरी मे.उदय इंजिनिअरींग वर्क्स यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 13.00 टक्के कमी दराची निविदा मा.स्थायी समिती सभेसमोर विचारार्थ तथा मान्यतेबाबत सादर.

**संवाद :**

| | |
|---|---|
| श्री.जगदिश सिध्द | :विषय क्रमांक 6 ला मतदान घेण्यात यावे असा आमचा प्रस्ताव आहे. स्थगीती देण्यात यावी स्थगीतीला मतदान घेण्यात यावे.<br>मा.सभापती विषय क्रमांक 6 ला स्थगीती देण्यासाठी मतदान घेण्यात यावे. |
| श्री.मधुकर सांवत | :सदरचा प्रस्ताव हा अपक्ष नगरसेवक श्री.कैलास गायकवाड यांचे वार्डातील आहे |
| श्री.विकास जैन | :आपण सर्व पाहणी करू. |
| श्री.मधुकर सांवत | :पाण्याचा प्रश्न आहे सदरचा विषय मंजूर करण्यात यावा. |
| श्री.विकास जैन | :आपण रद्द करित नाही. स्थगित ठेवतो. |
| श्री.मधुकर सांवत | :सदर कामाच्या ठिकाणी साईड व्हिजीट करण्यात यावी. स.सदस्य श्री.कैलास गायकवाड यांचे वार्डातील पाण्याचा प्रश्न आहे. मंजूर करण्यात यावा. मंजूर-नामंजूर ऐकून घ्यावे. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :महानगरपालिकेची आर्थीक स्थिती काय आहे?सभागृहाचे मत घेता स्थगित करा. |
| श्री.अ.साजेद अ.सत्तार | :आर्थीक स्थिती पाहून प्रस्ताव सादर केलेले आहे काय? आर्थीक स्थिती बाबत माहिती देण्यात आलेली नाही. प्रशासनाने खुलासा करावा. |
| श्री.विकास जैन | :मा.सचिव यांनी नियम वाचुन दाखविलेला आहे. मतदान घेता येईल. |
| श्री.अ.साजेद अ.सत्तार | :संबधीत अधिकारी यांचेकडुन खुलासा करण्यात यावा की, महानगरपालिकेची आर्थीक स्थिती काय आहे. दहा लाखाचे कामे स्थायी समितीमध्ये येतात मुख्यलेखाधिकारी यांचेकडुन मनपाची आर्थीक स्थितीविषयी माहिती घेण्यात यावी. सदरचा ठराव हा मनपाची आर्थीक स्थिती पाहुन आणलेला आहे का? |
| मुख्यलेखाधिकारी | :महानगरपालिकेची आर्थिक स्थिती हि नेक टू नेक चालू आहे. शिल्लक कुठलीही नाही. जेवढा खर्च आहे तेवढे उत्पन्न आहे. |
| श्री.विकास जैन | :सभागृहाचा वेळ वाया घालवु नये. |
| मा.सभापती | :ज्या वार्डाचा हा विषय आहे त्या वार्डात हया कामाची आवश्यकता आहे किंवा नाही खुलासा करण्यात यावा. |
| शहर अभियंता | :जे इस्टीमेट तयार करण्यात आलेले आहे ते 12 व्या वित्त आयोगाकडून जो निधी आलेला आहे त्याच्यामधून सदरचे इस्टीमेट तयार केलेले आहे. या भागातील वॉटर सप्लायच्या लाईन आहेत त्या 15 ते 16 वर्षापुर्वीच्या लाईनस् आहेत. पाणी गळतीचे प्रमाण जास्त प्रमाणात आहे. घाण पाणी, प्रेशरच्या तक्रारी जास्त आहे. त्यामुळे सदरील काम मंजूर करण्यात यावे. |
| मा.सभापती | :पाण्याचा प्रश्न असल्यामुळे मंजूरी करण्यात यावा. |
| श्री.विकास जैन | :मतदान घेण्यात यावे, सभागृहाला विनंती आहे. |
| श्री.जगदिश सिध्द | :मतदान घेण्यात यावे.(मा.सभापती यांचेसमोर येउन मागणी करतात.) |
| मा.सभापती | :सर्व सदस्यांनी आपआपल्या जागेवर बसुन चर्चा करावी. |

| | |
|---|---|
| श्री.जगदिश सिध्द | :मतदान घेण्यात यावे,सभा होउ देणार नाही. |
| मा.सभापती | :दादागीरीची भाषा करू नये. |
| श्री.जगदिश सिध्द | :आम्ही बहुमतात आहोत. आपण अल्पमतात आहात. |
| मा.सभापती | :पाण्याचा विषय आहे शहरात पाण्याची स्थिती गंभीर असतांना त्यास विरोध केला जात आहे.निधीची तरतुद असुनसूध्दा मतदानाची वेळ येते. दुर्देव आहे. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :शहरात जी कामे वर्क आर्डर झालेली आहे ती कामे सुरवातीस संपविण्यात यावे व नंतरच्या कामास सुरवात करावी असे आदेश मा.आयुक्तांनी दिलेले आहे. |
| श्री.विकास जैन | :मा.सचिव यांनी जी तरतुद वाचुन दाखविली आहे त्या प्रमाणे मतदानाची मागणी करता येते. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :आमचा विरोध नोंदवा. |
| श्री.मधुकर सांवत | :स.सदस्यांना विरोध दर्शवायचा असेल,तर जागेवर बसुन विरोध दर्शविण्यात यावा. |
| श्री.जगदिश सिध्द | :सर्व विषयांवर मतदान घ्यावे. |
| श्री.विकास जैन | :या सर्व विषयांवर मतदान घेण्यात यावे. नियमाप्रमाणे मतदान घेण्यात यावे. परत एकदा विनंती की, नियमावली वाचून दाखविण्यात यावे. |
| मा.सभापती | :सदस्य म्हणून अशा विषयांवर बोलावे, पक्ष बाजुला ठेवावा. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :आम्हाला माहीत आहे. आमचा विरोध नोदवून घ्या. आपली रुलिंग द्या. |
| मा.सभापती | :शहराच्या विकासासाठी या ठिकाणी आलेलो आहोत. 12 व्या वित्त आयोगातुन सदरचे काम होणार आहे. |
| श्री.जगदिश सिध्द | :मतदान घेण्यात यावे. |
| मा.सभापती | :आपण मतदान जरून घेवू. खुलासा करावा. 12 व्या वित्त आयोगाचा निधी आहे. महानगरपालिकेचे यामध्ये कुठलेही आर्थीक नुकसान होत नाही. |
| श्री.जगदिश सिध्द | :मतदान घेण्यात यावे. |
| श्री.विकास जैन | :बहुमताने प्रस्ताव मंजूर झाला पाहिजे. हि विनंती आहे. |
| मा.सभापती | :सदरचा निधी महानगरपालिकेचा नसुन 12 व्या वित्त आयोगाचा निधी आहे. मतदान घेवू पण का म्हणून घ्यायचे याचा खुलासा व्हावा.<br>(यावेळी सभागृहात अनेक स.सदस्य एकाच वेळी बोलतात) |
| श्री.अ.साजेद अ.सत्तार | :आत्तापर्यंत महानगरपालिकेत मतदान घेउन किती ठराव झाले आहे. मंजूर करावे. |
| श्री.जगदिश सिध्द | :शहराचा विकास करायचा असेल तर सर्वांना सोबत घ्यावे लागेल. मतदान घेण्यात यावे. |
| मा.सभापती | :या शहरात विकासाची कामे व्हावीत. आपण महापौर राहीलेले आहात. |
| श्री. अ.साजेद अ.सत्तार | :महानगरपालिकेच्या इतिहासामध्ये किती ठरावासाठी मतदान घेतलेले आहे खुलासा करण्यात यावा. |
| श्री.जगदिश सिध्द | :खुलासा घेण्याची गरज नाही, मतदान घेण्यात यावे. स्थगित करावे. यावर मतदान घ्यावे. |
| श्री.विकास जैन | :मतदान घेण्यात यावे. |
| श्री.अ.साजेद अ.सत्तार | :आत्तापर्यंत अनेक पक्षांचे सदस्य स्थायी समितीचे सभापती झालेले आहेत कोणत्या सभापतीच्या वेळी कोणत्या ठरावांना सदस्यांनी मतदान करण्याची किंवा घेण्याची कारवाई केली आहे खुलासा करण्यात यावा. |
| श्री.विकास जैन | :सर्व सदस्यांची मागणी आहे स्थगीतीच्या प्रस्तावावर मतदान घेण्यात यावे. |
| मा.सभापती | :शहरातील नागरीकांना कळु द्यावे की, विकासाच्या कामात देखील मतदान घेण्यात येते. वॉर्ड क्रमांक 51 इंदिरानगर येथे 100 व 150 मीमी व्यासाची |

डी.आय.के.7 जलवाहीनी टाकणे कामाकरीता मंजूरीसाठी सभागृहात आले असता महागनरपालिकेचे कुठलेहि आर्थीक नुकसान यात नाही. 12 व्या वित्त आयोगाचा निधी आहे. या प्रश्नावर स.सदस्य मतदान घेण्याची मागणी करीत आहे हे दुर्देव आहे हा प्रस्ताव स्थगीत ठेवण्यात येतो.

**ठराव :**

सदरील प्रस्ताव स्थगीत ठेवण्यांत यावा. असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. 07 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वॉर्ड क्र.14 अंतर्गत छत्रपतीनगर व भारतमातानगर येथे 100, 150 व 200 मीमी व्यासाची डी.आय.के. 7 जलवाहीनी टाकावयाचे प्रस्तावित आहे.

या कामासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे दरसूची सन 2008-09 नुसार रक्कम रू.14,91,000/- एवढ्याचे अंदाजपत्रक करण्यात आले आहे. मा.स्थायी समिती विषय क्र.365 दि.11/2/2010 अन्वये मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार ई-टेंडरींग मार्फत निविदा मागविली असता प्राप्त निविदाचा तपशील खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| 01. | मे.उदय इंजिनिअरींग वर्क्स | 12.99 % कमी दराने |
| 02. | सुरेश बी.साधवानी | 12.70 % कमी दराने |
| 03. | मे.एल.के.कन्स्ट्रक्शन | 08.86 % कमी दराने |
| 04. | व्ही.एस.देशमुख | 04.64 % कमी दराने |

उपरोक्त प्राप्त निविदामध्ये तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची निविदा मे.उदय इंजिनिअरींग वर्क्स यांची असून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 12.99 % कमी दराने आहे. त्यास मा.आयुक्त महोदय यांची मान्यता झालेली आहे.

तरी मे.उदय इंजिनिअरींग वर्क्स यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 12.99 % कमी दराची निविदा मा.स्थायी समिती सभेसमोर विचारार्थ तथा मान्यतेबाबत सादर.

**संवाद :**

श्री.रेणुकादास वैद्य :स्थगीत ठेवा.

श्री.जगदिश सिध्द :विषय क्रमांक 7 साठी मतदान घेण्यात यावे. विषय स्थगीत ठेवण्यात यावे.

मा.सभापती :हया प्रस्तावाची आवश्यकता आहे किंवा नाही प्रशासनाने खुलासा करावा.

कार्य.अभियंता(श्री.पानझडे) :सदरचा प्रस्ताव हा मनपा फंडातून प्रस्तावित केलेला आहे. वार्ड क्र.14 मध्ये देखील घाण पाणी, लिकेजेसच्या तक्रारी आहे. त्यामुळे सदरचा विषय प्रस्तावित केलेला आहे. मंजूरी देण्यात यावी.

श्री.जगदिश सिध्द :स्थगीती देण्यात यावी.

श्री.विकास जैन :विषय क्रमांक 2 ला स्थगीती देण्यात यावी. सगळया सभांचे इतिवृत्त कायम करण्याच्या विषयावर मतदान घेण्यात यावे यास आमचा विरोध आहे. विषय क्रमांक 2 ला स्थगीती देण्यात यावी. याची नोंद सगळयांनी घेण्यात यावी.

मा.सभापती : विषय क्रमांक 7 स्थगीती देण्यात येते.

**ठराव :**

सदरील प्रस्ताव स्थगीत ठेवण्यांत यावा. असे सर्वानुमते ठरले.

राष्ट्रगीतानंतर सभा संपल्याचे मा.सभापती, स्थायी समिती यांनी घोषित केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद